प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

ऋषींनी शिकवले तसे
आम्ही ध्यान शिकवतो.

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य होते. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्त ऋषींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

- ★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
- ★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
- ★ शांतता ही आपली भाषा आहे
- ★ ध्यान हा आपला मार्ग आहे
- ★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
- ★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
- ★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

# प्रकाशमार्ग

Volume 10 Issue 7 APRIL 2018 Rs. 25

## चिंतन

गुरुजी कृष्णानंद
(नोव्हेंबर १९९७ या अंकामधून, अनुवाद : जयंत देशपांडे)

डिसेंबर महिना सुरू झालाही. हे वर्ष किती लवकर निघून गेल्यासारखे वाटले. आणि माझ्या आयुष्याची ज्योत जसजशी जळत चालली आहे, अपूर्ण कामांचा ढीग वाढत चालला आहे. आरामात बसून १९९७ वर्षाबद्दल विचार करण्यासाठी मुळीच वेळ नाही. मला वाटते मी ह्यात पुष्कळ वेळ घालवला आहे आणि आता मला कामात पूर्णपणे गुंतून जायचे आहे.

हिवाळ्याची पकड अजून तेवढी घट्ट झालेली नाही. शेतं अजूनही हिरवीगार आहेत आणि कापणी लवकरच सुरू होईल. चंद्रकिरणांचा थंडावा माझ्या कित्येक स्वप्नांना जागे करत आहे. तपोनगरात खूप शांती आणि चैतन्य आहे! आपल्या विद्यार्थ्यांमध्ये घडणारे बदल होताना पाहणे किती आनंददायी आहे! ते आता जास्त बोलत नाहीत, खूप ध्यान करतात आणि समजूतदारपणा आणि संतुष्टीचे स्मित त्यांच्या चेहऱ्यांवर दिसते. त्यांना मोठे होताना पाहणे, हे किती आनंददायी आहे! पण काही लोकांना बदलण्यासाठी त्यांच्या अहम्‌सोबत संघर्ष करताना पाहून मला दुःख होते! आपला नवा मंत्र मला मदत करतो – ''त्यांच्यासाठी प्रार्थना करू या!''

मी सुनीलला कामाबद्दल आणि कामात असणाऱ्या आपल्या गुंतवणुकीबदल सांगत होतो. मला माहीत होते की तो पुढच्या पातळीवर दीक्षेसाठी आध्यात्मिक चाचणीची वाट पाहत होता, कारण मी त्या दिवशी, म्हणजे कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी, त्याला दीक्षा देण्याचे वचन दिले होते. मग एकाएकी मला प्रकाशझोत दिसला, सूक्ष्म पातळीवरील प्रकाशाचा झोत आणि एक साक्षात्कार झाला. मी त्याला सुद्धा त्याबद्दल सांगितले – दीक्षा म्हणजे, ज्याला दीक्षा दिली जाते, त्याला ऊर्जा प्रदान करणे एवढेच नसते. त्याला फक्त ऊर्जेने भारित करणे एवढेच नसते. त्याला उच्च स्तरासाठी तयार करणे हे सुद्धा असते. हे वेगवेगळ्या पातळीवर केले जाते. प्रथम मानसिक पातळीवर, त्यासाठी भावपूर्ण वातावरण तयार करून, त्यानंतर बौद्धिक पातळीवर त्याला त्या स्तराबद्दल समजावून आणि शेवटी त्याला आत्म्याच्या पातळीवर तयार केले जाते, ज्यात कित्येक आंतरिक प्रक्रियांचा समावेश असतो. हा दीक्षेचा मुख्य भाग असतो. आणि त्यानंतर अंतिम कृती म्हणजे साधकाला योग्य प्रकारच्या ऊर्जा, योग्य प्रमाणात देण्यात येतात. या तपशिलांवरून आपण समजू शकतो की साधनेत दीक्षेचे खूप महत्त्व असते.

आपण इथे दीक्षेचा गवगवा न करता, साधकांना फळे, फुले, गुरुदक्षिणा इत्यादी आणायला लावून त्याचा देखावा न करता, अशाप्रकारे दीक्षा देत असतो. पण आम्ही तसा देखावा न केल्यामुळे त्याचे महत्त्व पुष्कळदा लोकांना कळत नाही. आणि त्याची अर्थातच मला चिंता नाही!

कधीकधी फारंच गंमतशीर परिस्थितींशी माझा सामना होतो. कधीकधी लोकं मला प्रश्न विचारतात आणि जेव्हा मी त्याचे उत्तर देत असतो तेव्हा माझे उत्तर पूर्ण होण्यापूर्वीच ती लोकं मला पुढचा प्रश्न विचारतात! तेव्हा असे वाटते की फक्त प्रश्न विचारणे हाच त्यांचा हेतु असतो. उत्तरांचे काय? त्यांना उत्तर तेव्हाच कळेल जेव्हा ते ऐकतील. पण ऐकणे हे इतके कठीण आहे की फार थोड्यांना ते जमते.

एका ध्यानसाधकाला खूप छान अनुभव आला. त्याने विजेचा झोत अनुभवला. हा एक अपूर्व अनुभव आहे. वीज ही दश–विध नादांपैकी शेवटची आहे आणि ह्या अनुभवानंतर साधकाला समाधी लागते. या साधकाच्या बाबतीत, मी समजू शकलो की त्याला प्रत्यक्ष परमेश्वराचे दर्शन झाले! परमेश्वर नेहमीच मानवी रूपात दर्शन देत नाही. तो प्रकाशस्वरूपात दिसतो. जेव्हा मी या साधकाचा अनुभव ऐकला, तेव्हा मला खूप समाधानकारक आनंद झाला, जणू मीच तो अनुभव घेतला असावा. आध्यात्मिक क्षेत्राची ही महानता आहे. एका व्यक्तीचा अनुभव हा सर्वांचा आनंद असतो! ■

मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : ९९०००७५२८० (सकाळी १० ते सायं. ५ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)
सप्तर्षी ध्यान केंद्र

**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)
सप्तर्षी ध्यान केंद्र

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

**Doorways (इंग्रजीत) / तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)**
**वार्षिक वर्गणी रू. ३००/–**
**ड्राफ्ट कृपया मानसा लाइट एज फाउंडेशन च्या नावाने काढावा.**
**कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.**

### वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.







**रहिवाशांच्या भेटीत अमराजींची जयंती आणि महाशिवरात्री साजरी करण्यात आली.**

### काही ठळक घडामोडी

- बुधवार, २ मे २०१८ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत तपोनगर येथे ओरिएंटेशन वर्ग आयोजित करण्यात येईल. वेबकास्टची सवलत असलेल्या बाहेरील विद्यार्थ्यांना देखील वर्ग चालू असताना होणाऱ्या प्रत्यक्ष प्रसारणाद्वारे ह्यात भाग घेता येईल. भाग घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी कृपया ३० एप्रिल २०१८ पर्यंत मानसा कार्यालयाशी संपर्क साधून आपले नाव नोंदवावे.
- ११ मार्च २०१८ ला शंबलाच्या महान गुरूंकडून विशेष दीक्षा घेण्यासाठी शंबला गटाचे सदस्य तपोनगरात एकत्र जमले आणि इतर अनेक सदस्य आपापल्या घरून सहभागी झाले.
- 'रा' देवतेकडून विशेष ऊर्जा ग्रहण करण्यासाठी १८ मार्च २०१८ ला 'रा' गटातील सदस्यांची बैठक झाली.
- आपल्या प्रकाश प्रवहन स्वयंसेवकांनी ५००० पेक्षा जास्त शाळांमधे प्रकाश प्रवहन करण्यास शिकवले आहे. सुमारे २८ लाख मुले प्रकाश प्रवहन करण्यास शिकली आहेत आणि अंदाजे १२०० शाळांतील जवळजवळ ५ लाख मुले नियमितपणे प्रकाश प्रवहन करीत आहेत. प्रकाश प्रवहनाची जाणीव पसरविण्यासाठी आणखी स्वयंसेवकांची आवश्यकता आहे. ह्या कार्यात भाग घेऊ इच्छिणारे, जर आठवड्यातून अर्धा दिवस वेळ देऊ शकत असतील, तर त्यांनी कृपया मानसा कार्यालयाशी संपर्क साधावा.

गुरुजींचे ब्लॉग वाचण्यासाठी व व्हीडियो पाहण्यासाठी कृपया www.speakingtree.in या वेबसाइटला भेट द्यावी.

### ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०८ | रविवार | कृष्णाष्टमी |
| १४ | शनिवार | सौरमान युगादी / शिवरात्री |
| १६ | सोमवार | अमावास्या |
| १८ | बुधवार | अक्षय्य तृतीया |
| २३ | सोमवार | शुक्लाष्टमी |
| २५ | बुधवार | शुक्ल दशमी |
| २९ | रविवार | बुद्ध पौर्णिमा |

### तपोनगरातील कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| दर रविवारी | – | व्याख्यान, सकाळी ११ ते मध्यान्ह १२ पर्यंत |
| | – | प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत |
| रविवार ०८ | – | लाइट चॅनल वॉलंटीयर्स मीटिंग, दुपारी २ वाजता |
| रविवार २९ | – | अखंड ध्यान (प्रकाश प्रवहन), सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत |

### आनेकल येथील कार्यक्रम

१६ एप्रिल २०१८ रोजी संध्याकाळी ६ वाजता आनेकल येथील आपल्या सप्तर्षी ध्यान केंद्राचा दहावा वार्षिक दिन साजरा करण्यात येईल.

रविवारच्या व्याख्यानाचे, इंटरनेटवरून प्रत्यक्ष प्रसारण विद्यार्थ्यांकरता उपलब्ध राहील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी ई–मेल द्वारा संपर्क साधावा.

## प्रकाश प्रवहनाचे अनुभव

संकलन : वैशाली जोशी, अनुवाद : वैशाली नितीन तरे

आम्ही रेल्वे स्टेशनजवळ स्कूटर ठेवली आणि एका तासात काम संपवून परत आलो. इंजिन बऱ्याच वेळ बंद राहिल्यामुळे स्कूटर लगेच चालू होईना. काही काळानंतर ती चालू झाली परंतु अर्ध्या अंतरावर ती पुन्हा बंद पडली. तिच्यामध्ये इंधनही होते पण तरीही ती चालू होईना. ती चालू करण्याकरिता माझ्या मिस्टरांनी खूप प्रयत्न केले. मी तिथेच प्रकाशाचे प्रवहन करण्यास सुरुवात केली. मी माझ्या मिस्टरांना पुन्हा स्कूटर चालू करण्यास सांगितले. स्कूटर व्यवस्थितपणे चालू झाली आणि आम्ही घरी पोहोचलो. हा माझा प्रकाश प्रवहनामुळे आलेला पहिलाच अनुभव होता.

– मुग्धा मिलिंद कुळकर्णी, प्रकाश प्रवाहक

मी प्रकाश प्रवहनाच्या सत्रानंतर घरी आले व नेहमी प्रमाणे दरवाजा बंद केला पण किल्ली मुख्य दरवाजालाच विसरले. आमच्या घराला दोन दरवाजे आहेत – सिक्युरीटी दरवाजा व मुख्य दरवाजा. मी एकटीच घरात असल्यामुळे सिक्युरीटी दरवाजा व्यवस्थितपणे लावून घेतला. मी जेव्हा संध्याकाळी दरवाजा उघडण्यास गेले तेव्हा तो उघडेचना, तेव्हा मला काय घडले ह्याची कल्पना आली. मी बऱ्याच वेळ दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला पण मला त्यामध्ये काही यश आले नाही. जवळपास कुणीच नव्हते की कुणाची मदत घ्यावी. माझे मिस्टर देखील ऑफिसमध्ये होते. नंतर माझ्या लक्षात आले की दरवाजा उघडणे शक्यच नाही. सिक्युरीटी दरवाजाची सर्व अतिरिक्त कुलुप होती ती देखील मी लावली होती. त्यामुळे दरवाजा कापला तरच उघडणार होता. तेव्हा मात्र मी खूप बेचैन झाले. मी दरवाज्यापाशी आले, डोळे बंद केले आणि मनापासून ऋषींची आणि प्रकाशाची प्रार्थना केली की कृपा करून मला दरवाजा उघडण्यासाठी मदत करा, आणि मी पुन्हा तो उघडण्यासाठी दरवाजाला हात लावला आणि तो जणू काही बाहेरून कोणीतरी उघडावा इतक्या हळुवारपणे उघडला आणि प्रसन्न वाऱ्याची झुळूकही आतमध्ये आली. किल्ली दरवाजाला लागलेलीच होती. माझे डोळे पूर्णपणे अश्रूंनी भरून गेले. मी आदरयुक्त अंत:करणाने ऋषींचे व प्रकाशाचे आभार मानले. मी अतिशय भारावलेल्या अवस्थेत ध्यानास बसले. एक वेगळीच प्रसन्नता वाटली, शांतता व प्रकाशाची अनुभूती झाली. दरवाजा उघडावा म्हणून जवळजवळ दीड तासापासून मी प्रयत्न करीत होते परंतु प्रकाशाची प्रार्थना केल्यावर तो लगेच उघडला. ऋषींच्या व प्रकाशाच्या उपस्थितीची जाणीव झाली व माझे मन कृतज्ञतेने भरून गेले.

– वैशाली नितीन तरे, प्रकाश प्रवाहक

## तपोनगर डायरी

सीमा अलमेल, अनुवाद : वैशाली जोशी

तपोनगरात पहिल्यांदाच, रहिवाशांच्या भेटीत स्त्रीयांनी अमराजींची जयंती आणि महाशिवरात्री साजरी करण्यासाठी एक सुरेख नृत्य सादर केले. कु. श्रुती सुधाकर हिने संकल्पनेची सुरुवात केली आणि सौ. अभिलाषिता, सौ. नयना आणि कु. श्रीयुक्ता त्यात सहभागी झाल्या, आणि त्यांनी तीन गाण्यांवर प्रस्तुत केलेल्या मिश्र नृत्यक्रमाचे सौंदर्य वाढविले. त्या सर्वांनी भरतनाट्यममध्ये वेगवेगळ्या स्तरांपर्यंत प्रशिक्षण घेतलेले आहे. त्यांनी नृत्यालेखन सूक्ष्म, पण बाकीच्या कलाकारांना समगती राखता यावी यासाठी पुरेसे वेगळे ठेवले होते. बंगाली पद्धतीने साड्या नेसून, ज्या कुणी दैवी स्त्री तत्त्वाचे प्रतिनिधित्व करीत होत्या, त्यांनी हातात दीप धरून, त्यांच्याशी एकसूर साधून तालावर नृत्य केले, ज्यांनी दैवी पुरुष तत्त्वाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी विशेष पोषाख घातले होते. शिव–पार्वती आणि अमराजीसारखे पोषाख घातलेली मुले कौतुकास्पद दिसत होती. सराव, किंवा असं म्हणा, मौजमजेची सत्रे कार्यक्रमाच्या अनेक दिवस आधी सुरू झाली. नेहमीप्रमाणे, कार्यक्रमासाठी मोठा डायनिंग हॉल सदभिरुचिने सजविण्यात आला होता. कलाकारांचा संपूर्ण गट, केवळ तिथे एकत्र जमलेल्या लोकांनाच नव्हे, तर सर्व अलौकिक सूक्ष्मजीवांना देखील दृष्टि–सुख देणारा होता, जे आपल्या सहजसुंदर नृत्य कलाकारांची तुलना स्वर्गातील अप्सरांशी करण्यास भाग पडले असतील.

श्री. गिरीश व त्यांच्या पत्नी सौ. रश्मी यांनी बेळगावीमधील अमराजींच्या मूळस्थानाच्या दुर्मिळ फोटोंचा संग्रह सर्वांना दाखवला. त्यांनी त्या जागेला दिलेल्या त्यांच्या शेवटच्या भेटीला तीर्थयात्रा समजून तिथले फोटो काढले होते आणि तिथे आजुबाजूला असलेल्या जुन्या काळच्या लोकांकडून पूर्वस्मृतीची विवरणे गोळा केली होती. असा प्रत्येक कार्यक्रम तपोनगरवासियांसाठी गुरुजी आणि प्रकाश गुरुंबद्दल असलेले त्यांचे प्रेम दर्शविण्याचा प्रसंग बनतो. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंत:करणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंध:काराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्त्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्वल भविष्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८–०५–२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.
२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.
३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.
४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.
५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.
६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.
७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वत:हून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

संकलन : शोभा राव, अनुवाद : वैशाली जोशी

सप्टेंबर २००५

ऋषींकडून मदत मागितल्यावर, आणि ती मिळाल्यानंतर, ऋषींकडून हीलिंगचे उपचार मिळाल्यानंतरही, जर कुणाची दुसरी एखादी पद्धत वापरून पाहण्याची इच्छा असेल, मदत घेण्यासाठी किंवा हीलिंगसाठी इतर कोणत्यातरी व्यक्तीकडे किंवा गटाकडे जाण्याची इच्छा असेल, तर ते योग्य आहे की चुकीचे आहे? मी म्हणतो, "त्यात काय चुकीचे आहे?" तुम्हाला स्वातंत्र्य आहे आणि तुम्ही कुठुनही मदत मिळवू शकता, आणि आपल्याला कुठुनही मदत मिळाली तरी ती फक्त देवाकडूनच येते. यासाठी कोणत्याही व्यक्तीला किंवा गटाला एकमात्र कॉपीराईट नाही. आराम मिळणे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट आहे. हा सत्याचा एक भाग आहे. ह्याचे इतर परिणाम असतात, नैसर्गिक परिणाम, जे आपण समजून घ्यायला हवे. जेव्हा तुम्हाला इतर स्रोतांकडून मदत किंवा हीलिंग मिळण्यास सुरुवात होते, तेव्हा आम्ही आमची मदत किंवा हीलिंग थांबवतो. याचे कारण हे आहे की आमच्या पद्धती भिन्न आहेत आणि साहजिकच दुसऱ्या स्रोताच्या पद्धती पण भिन्न असणार. ह्या दोन्ही भिन्न पद्धती किंवा तंत्रे एकत्रितपणे चांगल्याप्रकारे कार्य करू शकत नाहीत. अशाने गोंधळ होतो, आणि ते योग्य नाही. यामुळे निश्चितच कोणतेही नुकसान होणार नाही. याची आणखी एक अतिशय सूक्ष्म बाजू आहे – इथून पूर्णपणे किंवा पुरेशी मदत मिळायच्या आधीच, किंवा त्यांचा जर ह्या मार्गावर विश्वास नसेल तर लोकं इतर कुणाकडूनतरी मदत घेण्याचा प्रयत्न करतात. ही देखील एक वास्तविकता आहे.

जर एखादी व्यक्ती हीलिंगची मदत घेणे पुन्हा सुरू करण्यासाठी इथे परत आली, तर आपण काय करावे? अर्थात आम्ही मदत सुरू ठेवू; याबद्दल काहीच शंका नाही. पण या लहानसहान तपशीलांबद्दल विसरून जा – एक अत्यावश्यक गोष्ट जी तुम्ही लक्षात ठेवली पाहिजे ती ही की, जेव्हाकेव्हा आपल्याला कुठुनही मदत मिळते, ती आपल्याला देवाकडून मिळते आणि सर्व ऊर्जा फक्त देवाकडूनच येतात. आपली जर देवावर श्रद्धा असेल, तर ते पुरेसे आहे. व्यक्तींवर असलेल्या विश्वासात बदल होऊ शकतो किंवा तो कमीअधिक होऊ शकतो, त्याने काही फरक पडत नाही.

यापुढे, आपण आपल्याला जे ज्ञान आधीच मिळालेले आहे त्याचे उपयोजन करण्यावर जास्त लक्ष केंद्रित करू या. हा साधनेचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. आपण जर ह्या ज्ञानाचा वापर किंवा उपयोग केला नाही, तर ते व्यर्थ आहे. आपण जर आपल्याला इथे मिळालेल्या ज्ञानाचा आणि विवेकाचा उपयोग केला, तर आपल्या जीवनाचा दर्जा सुधारतो. आपली परमेश्वराच्या दिशेने वाटचाल सुरू होते.

आपण जर आपल्याला मिळालेल्या ऊर्जा किंवा तंत्रांचा उपयोग करणे किंवा वापरणे सुरू केले, तर ते आपल्याला आपली कर्मे जाळून टाकण्यास मदत करतील; आपल्याला शुद्ध करून परमेश्वराची कृपा मिळण्यासाठी अर्हता प्राप्त करून देतील. म्हणूनच यम–नियम, शंबला तत्त्वे अत्यंत महत्त्वाची ठरतात. आपण जर यम–नियम किंवा शंबला तत्त्वांचा सराव केला तर आपल्याला ध्यान करण्याची आवश्यकता नाही. आपण ध्यानसाधना थांबवू शकतो.

मी लोकांशी बोलतो आणि अनेक वेळा मी बोलण्याचे टाळतो सुद्धा. कधीकधी मला बोलावे लागते, आणि एखादे चांगले संभाषण किंवा एक प्रकारची चर्चा मला आवडते. कधीकधी देवाणघेवाण करताना आम्ही उच्च पातळ्यांवर पोहोचतो आणि अशा वेळी मला निश्चितच आनंद होतो. अशा एका संवादादरम्यान आम्ही या मुद्द्याविषयी बोललो – जेव्हा आपण एखाद्या मार्गात किंवा एखाद्या व्यक्तीकडे शिकण्यासाठी जातो, तेव्हा आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की आपण विद्यार्थी आहोत. एक विद्यार्थी एक भावी शिक्षक असू शकतो, एक महान गुरू होऊ शकतो पण ज्या वेळी तो शिकत असतो, त्या वेळी तो एक विद्यार्थी असतो, आणि त्याने शिकले पाहिजे पण शिकवण्याचा प्रयत्न केला नाही पाहिजे. त्याने जर शिकवण्याचा प्रयत्न केला तर गोंधळ होईल. कोणत्याही वेळी फक्त एकच भूमिका करणे शक्य असते. मी नेहमी म्हणतो की गाडी एकच व्यक्ती चालवू शकते आणि दुसऱ्या व्यक्तीला त्याच्या मागे बसावे लागते.

आपल्याला सर्वांना परमेश्वर आणि ऋषींकडून संदेश मिळत असतात. पण कसे कुणास ठाऊक आपण ऐकण्याची सवय गमावली आहे कारण आपण सर्वकाळ बोलत राहातो! आपण जर नुसते क्षणभर शांत बसलो आणि थोडेसे सावध झालो तर आपण परमेश्वर आणि ऋषींना ऐकू शकतो. माझ्यामध्ये किंवा कोणामध्येही विशेष असे काहीही नाही; इथे प्रत्येकजण विशेष आहे. आपण जर विशेष नसतो, तर आपण इथे बसलेलो नसतो.

आपण अनेक वेळा विचार आणि भावनांविषयी बोलतो. या दोन वेगळ्या गोष्टी आहेत आणि हे आपल्याला माहीत आहे. विचार बुद्धीमध्ये उद्भवतात आणि भावना मनामध्ये. जरी आपल्याला माहीत आहे की ते भिन्न आहेत, तरी साधारणपणे आपण पाहिले तर त्यांना विलग करणे खूपच कठीण आहे. ध्यान हे त्यांना विलग करण्यासाठी शोधलेले तंत्र आहे. जेव्हा तुम्ही प्राथमिक पातळीच्या वर्गात असता, तेव्हा आम्ही मनासाठी मंत्र देतो आणि बुद्धीसाठी धारणा, जेणेकरून ते दोघेही वेगवेगळ्या कृतींमध्ये व्यस्त राहतील. त्यांना शांत करण्यासाठी हे विलगीकरण आवश्यक आहे. एकत्र असताना ते खूप बळकट असतात; विभक्त असताना ते कमकुवत होतात. एकत्र असले की ते आपल्याला नियंत्रित करतात आणि जेव्हा ते विलग होतात तेव्हा आपण त्यांच्यावर नियंत्रण ठेवू शकतो. ध्यानामध्ये हे विचार आणि भावनेचे विलगीकरण घडते. ते हस्तक्षेप करत नाहीत. ते दुर्बल आणि शांत होतात. तेव्हा आपण आपली जाणीव मुक्त करू शकतो, आणि जाणीव वर उच्च पातळ्यांवर पोहोचते.

जेव्हा आपण ध्यान करतो, तेव्हा त्याचा प्रभाव आपल्यावर २४ तासांपर्यंत राहतो. ह्या प्रभावाखाली, जेव्हा आपण ध्यान करीत नसतो त्या काळादरम्यान देखील आपण विचार आणि भावनांना वेगवेगळे करू शकतो, ज्याने आपल्या जाणिवेला शुद्धता, शांती आणि प्रेमाच्या उच्च पातळ्यांवर नेण्यास मदत होते. हे अत्यंत महत्त्वाचे आहे कारण जेव्हा आपली जाणीव चेतनेच्या उच्च पातळ्यांवर पोहोचते, तेव्हा ती ही शांती, शुद्धता आणि प्रेम अनुभवते, आणि अनुभव घेतल्यानंतर ती हे अनुभव आपल्या विचारांना आणि भावनांना अंतरित करू शकते. मग साहजिकच आपल्या भावना आणि विचार सामान्य दर्जाचे नसतील, तर ते पूर्णपणे शांती, शुद्धता आणि प्रेमाने युक्त असतील. आणि मग आपण कधीही कोतेपणाने भावना व्यक्त करू शकणार नाही; आपण नेहमी उदात्तपणे भावना व्यक्त करू. ही प्रक्रिया आपोआप घडते आणि आपल्या सर्व भावना आणि विचार आध्यात्मिक, सकारात्मक बनतात. सकारात्मकतेची किंवा आध्यात्मिकतेची सुरुवात ध्यानसाधनेने होते. आणि हे ध्यानाव्यतिरिक्तच्या काळादरम्यान घडते. आपण ध्यानाचा प्रभाव पडू दिला पाहिजे म्हणजे सकारात्मकता आपोआप घडून येते. ■

# श्री जयंत देशपांडे ह्यांच्या व्याख्यानातील उतारे

संकलन : शोभा राव; अनुवाद : सुनिता देशपांडे

०४-०२-२०१८

तीस वर्षांपूर्वी गुरुजी आणि सात इतर लोकं अंतर-मानसा येथील झोपडीत गोळा झाले आणि त्यांनी तेथे बसून ध्यान केले आणि मानसा फाऊंडेशनचा जन्म झाला, महर्षी अमरांच्या जन्मदिनी.

गुरुजी आम्हाला सांगत असत की, प्रत्येक अशा प्रसंगी महर्षी अमर आपल्यासाठी कित्येक भेटवस्तू घेऊन येतात. या भेटवस्तू प्रत्येकासाठी अद्वितीय असतात. ते अद्‌भुत ऊर्जा घेऊन येतात. आज जेव्हा आपण ध्यान करू तेव्हा या ऊर्जा आपल्याला मिळतील. त्यापूर्वी मला काही छोटे मुद्दे सांगायचे आहेत.

महर्षी अमर ऋषींच्या कार्यात हजारो वर्षांपासून सामील आहेत. कदाचित ते लाखो किंवा कोट्यावधी वर्षांपासूनही या कार्यात सामील असतील; आपल्याला माहीत नाही. ते अमर आहेत. आपल्याला एवढेच माहीत आहे की, ते या पृथ्वीवर जवळजवळ प्रत्येक शताब्दीतच जन्म घेतात. त्यांनी किती जन्म घेतले असतील आणि किती लोकांना मार्गदर्शन दिले असेल? आपण फक्त कल्पनाच करू शकतो. महर्षी अमरांच्या रुपात त्यांच्या या जन्मात त्यांच्या मार्गदर्शनाखाली पाच हजार पेक्षाही जास्त लोकांना मुक्ती मिळाली! १९७४ सालापूर्वी तसे घडले. गुरुजींनी आम्हाला सांगितले की, १९७४ सालानंतर जे लोक महर्षी अमरांकडे आले, ते ऋषीकार्यासाठी आले होते, मुक्तीसाठी नाही.

त्यांच्या सर्व जन्मांबद्दल आपल्याला माहीत नाही. आपल्याला माहीत आहे की, ते महाराष्ट्रातील महान संत गोरा कुंभार म्हणून आले होते. आणि पुन्हा संत एकनाथ महाराज म्हणून. प्रत्येक जन्मात, नवे ज्ञान आणून अज्ञानाच्या अंधकाराला दूर करण्यात त्यांची महत्त्वाची भूमिका होती. ती त्यांची विशेषता आहे. प्रत्येक जन्मात ते नवे ज्ञान आणत, आध्यात्मिकतेबद्दल एक नवा दृष्टिकोन आणत. या जन्मातही, म्हणजे महर्षी अमरांच्या रुपात त्यांनी आध्यात्मिक साधनेबद्दल व्याप्त असे कित्येक गैरसमज दूर केले. ते परत येईपर्यंत, आपल्याला गुरुजींनी प्रस्थापित केलेली ही व्यवस्था जिवंत ठेवावी लागेल, त्यांनी आपल्याला दिलेले हे ज्ञान लोकांसाठी उपलब्ध करून द्यावे लागेल, ध्यानसाधनेसाठी गुरुजींनी निर्माण केलेल्या या सर्व सुविधा व्यवस्थित ठेवाव्या लागतील, म्हणजे लोकांना इथे येऊन ध्यान करता येईल आणि इथे असलेल्या अद्भुत ऊर्जा मिळवून प्रगती करता येईल.

जेव्हा या पृथ्वीवर अज्ञान मोठ्या प्रमाणावर विद्यमान असते, तेव्हा नवे ज्ञान आणणे तेवढेच अवघड असते. महान गुरूंना सर्व ज्ञान असते पण ते सर्व ज्ञान लोकांपुढे मांडत नाहीत, कारण लोकं ते समजू शकत नाहीत. महर्षी अमरांच्या सूक्ष्म जगातील पराक्रमांबद्दल आपल्या जे ज्ञात आहे, ते फार थोडे आहे. त्यातील बहुतांश गोष्टी अज्ञात आहेत. पुढे भविष्य काळात कदाचित या गोष्टी पुराणांमध्ये नमूद केल्या जातील. भूतकाळात जेव्हा आपली पृथ्वी अतिशय अंधकारमय काळातून जात होती, तेव्हा आध्यात्मिक सत्यांबद्दल बोलणाऱ्या महान आध्यात्मिक गुरुंना खूप त्रास देण्यात आला, काही गुरुंना तर मारण्यात आले, कारण तेव्हा लोकं नव्या गोष्टींचा स्वीकार करण्यास तयार नव्हते. पण अगदी अंधकारमय काळात सुद्धा महर्षी अमरांसारखे महान गुरू संपूर्ण मानवप्राण्यांना आध्यात्मिकतेच्या वरच्या पातळीवर नेत असतात. तेवढ्या प्रचंड प्रमाणात प्रकाश ते बाळगत असतात.

जेव्हा जेव्हा त्यांनी या पृथ्वीवर जन्म घेतला, तेव्हा त्यांनी एक आध्यात्मिक चळवळ सुरू केली. संत एकनाथ महाराजांनी आध्यात्मिक चळवळ सुरू केली, जी अजूनही सत्यशोधकांचे मार्गदर्शन करते. आणि जेव्हा महर्षी अमर म्हणून त्यांनी जन्म घेतला, तेव्हा त्यांनी नवयुगाची आध्यात्मिक चळवळ सुरू केली. मला वाटत नाही की, त्यांच्यापूर्वी कोणीसुद्धा नवयुग किंवा सत्ययुगाबद्दल इतक्या स्पष्टपणे लोकांना सांगितले होते. आपण असे म्हणू शकतो की, ते नवयुगाचे किंवा सत्ययुगाचे संस्थापक आहेत. ते अशा एका कार्यक्रमात सहभागी होते, ज्याच्यात नवयुगाशी निगडित प्रक्रियांची सुरुवात करण्यात आली. या पृथ्वीवरील जीवनात त्यांची किती महत्त्वाची भूमिका आहे, ह्याची कल्पना आपण करू शकतो. त्यानंतर ऋषींनी पुष्कळ गोष्टी केल्या असतील आणि आता लोकांमध्ये एक नवी जाणीव आहे. लोकं आता नव्या ज्ञानाचा स्वीकार करू शकत आहेत. लोकं आता मोठ्या प्रमाणात ध्यान साधना करत आहेत. काळाचा स्वतःचाच एक प्रभाव असतो आणि तो आपण पाहू शकतो.

महर्षी अमरांच्या अद्भुत कार्यांबद्दल जेव्हा आपण बोलतो, तेव्हा लोकांना ती अतिशयोक्ती वाटू शकते. पण तसे नाही. जेव्हा ते संत एकनाथ महाराजांच्या रुपात आले होते, तेव्हा भगवान श्रीकृष्णांनी एका मुलाच्या रुपात त्यांच्याकडे १२ वर्षे काम केले! महर्षी अमर एक थोर गुरू होते, पण त्यांनी इतरांना ते जाणवू दिले नाही. मला असे म्हणायचे आहे की, लोकांना त्यांच्या सान्निध्यात खूप छान आणि प्रसन्न वाटत असे. ते लोकांना खूप जवळचे वाटायचे. त्यांनी लोकांना सांगितले की, ते सुद्धा महान आध्यात्मिक उंचीवर पोहोचू शकतात. आणि त्यांनी केवळ सांगितलेच नाही तर, तिथे पोहोचण्याचा मार्ग दाखवला, ध्यानाचा मार्ग दाखवला. ध्यानाचा उपहार, हा आपल्यासाठी सर्वात मौल्यवान उपहार आहे. ध्यान आपल्याला वैयक्तिकरित्या आध्यात्मिकतेच्या महान उंचीवर घेऊन जाते आणि सर्व मानवप्राण्यांना एकत्रितपणे नवयुगाकडे नेत असते.

काल रात्री जेव्हा मी आजच्या व्याख्यानासाठी तयारी करत होतो, तेव्हा आपल्या स्वयंसेवकांपैकी एका स्वयंसेविकेने मला एक मेसेज पाठवला. तिने मला, फेब्रुवारी २००२ मध्ये गुरुजींनी दिलेल्या व्याख्यानाचे काही उतारे पाठवले. त्या व्याख्यानात गुरुजी म्हणाले होते, "माझ्या जन्मापूर्वीच ऋषींनी मला विशेष प्रशिक्षण दिले. त्यांनी माझ्याकडे विशेष लक्ष देऊन पुष्कळ वर्षं मला प्रशिक्षण दिले. त्यांनी मला जीवनात कधीही आशा न सोडण्यास, जीवनाविषयी, लोकांविषयी कधीही मनात कडवटपणा न आणण्यास शिकवले." आपल्याला माहीत आहेच की, गुरुजींना कशा परिस्थितींमधून जावे लागले, तरीही त्यांच्या मनात कधीही कडवटपणा नव्हता. ते पुढे म्हणाले, "त्यांनी मला या भौतिक व सूक्ष्म पातळीवरही काम करण्यास शिकवले. आणि आता जेव्हा मी स्वतःच्या जीवनाकडे मागे वळून बघतो, तेव्हा मला हे कळते की, माझ्या जीवनात ज्या सर्व गोष्टी घडल्या, सर्व चांगल्या आणि वाईट गोष्टी, त्या मला इथे आणण्यासाठी योजलेल्या होत्या. त्या सर्व घटनांमधून जाणे माझ्यासाठी एकप्रकारे तयारी होती. आणि आता मला आठवते की, मी पहिल्यांदा जेव्हा महर्षी अमरांना पाहिले, पहिल्यांदा मी जेव्हा त्यांना भेटलो, तेव्हा मी त्यांना प्रकाशरूपात पाहिले. त्या प्रकाशाचा मी एक भाग होतो. ते प्रकाशाचा एक मोठे क्षेत्र होते आणि मी त्याचा एक कण होतो. आता मला कळते की, मी आणि महर्षी अमर, आम्ही एकप्रकारचा गट आहोत. ते खूप थोर व्यक्ती आहेत आणि मी एक छोटा कार्यकर्ता आहे, पण आम्ही एक गट आहोत. शेवटच्या महायुगातही, मला आठवते की, ते आधी आले होते, त्यांनी पाया उभारला आणि नंतर मी कार्य सुरू केले आणि मागील महायुगातही आम्ही असेच केंद्र स्थापित केले होते. या महायुगातही तसे घडले." हे गुरुजींचे शब्द होते आणि मला तुम्हाला हे सांगावेसे वाटले. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्षात ध्यान वर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी नोंदणी शुल्क २५०० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी १३०० रू. आहे. भारताबाहेर राहाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नोंदणी शुल्क ४५०० रू. आहे. ह्या शुल्कात मासिकासाठी वार्षिक वर्गणी आणि पाठ्यपुस्तकांची किंमत समाविष्ट आहे.

त्यानंतर, वार्षिक नूतनीकरण शुल्क, इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी २००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी ९०० रू. आहे. भारताबाहेर राहाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वार्षिक नूतनीकरण शुल्क ३५०० रू. आहे. ह्या शुल्कात मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- ★ सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ–मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ★ ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- ★ सगळ्या शंका व प्रश्नांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- ★ मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- ★ साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

**चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.**

## गुरुजींकडून विशेष सूचना

- ★ विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- ★ प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- ★ प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ★ ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ★ ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## श्री जयंत देशपांडे ह्यांच्या व्याख्यानातील उतारे

संकलन : शोभा राव; अनुवाद : वैशाली जोशी

२५–०२–२०१८

सर्व स्वयंसेवक एका रविवारी येथे एकत्र जमले आणि त्यांनी त्यांचे 'वर्ल्ड चॅनल्स डे' चे अनुभव सांगितले. अडीच तासांपेक्षा जास्त वेळ आम्ही इथे बोलत होतो, अनुभव ऐकत होतो आणि देवाणघेवाण करीत होतो आणि तरीही कोणालाच कोणत्याही प्रकारचा कंटाळा किंवा जडपणा किंवा थकवा जाणवला नाही. मला खात्री आहे की, आम्ही आणखी खूप वेळ बोलत बसलो असतो तरीही आम्हाला खूप आल्हाददायी वाटले असते. जेव्हा आपण आध्यात्मिक विषयांवर देवाणघेवाण करीत असतो तेव्हा कसे कुणास ठाऊक आपण परमेश्वराच्या उपस्थितीत जगत असतो. आपण परमेश्वराशी जोडलेलो असतो आणि तेव्हा कोणतीच समस्या नसते. आपण तासंतास बोलत राहू शकतो आणि आपल्याला वेळेचे भान राहात नाही. त्या दिवशी अगदी असेच घडले. स्वयंसेवकांनी विलक्षण अनुभव सांगितले.

एका स्वयंसेवकाने सांगितलेला एक अनुभव मला सांगावासा वाटतो, जो खूपच हृदयस्पर्शी आहे. त्या दिवशी एका शाळेत प्रकाश प्रवहनाच्या सत्रानंतर एका शिक्षिकेने, जिने सत्रामध्ये भाग घेतला होता, अश्रूपूर्ण डोळ्यांनी आणि खोल कृतज्ञतेने तिच्या अनुभवाचे वर्णन केले. ती कित्येक महिन्यांपासून एक प्रकारच्या दु:खाने पीडित होती. आणि त्या प्रकाश प्रवहनाच्या सत्रादरम्यान तिचे दु:ख नाहीसे झाले. आपल्याला माहीत आहे प्रकाशामध्ये हीलिंगच्या ऊर्जा असतात. आणि तिला एक प्रकारच्या तत्क्षणिक हीलिंगची अनुभूती झाली! हा एक चमत्कारच होता!

हीलिंगच्या प्रक्रियेत कर्मे हाताळणे समाविष्ट असते. गुरुजींनी खुलासा केला होता की हीलिंग एक आध्यात्मिक प्रक्रिया आहे. म्हणून हीलिंग अगदी सहजगत्या केले नाही पाहिजे. ती निस्संदेह एक थोर गोष्ट आहे. गुरुजींनी सांगितले होते की उपचार केल्या जाणाऱ्या व्यक्तीच्या कर्माचा एक लहानसा भाग आपल्याकडे येतो. पण आपण त्याबद्दल काळजी करण्याची गरज नाही. आपण ध्यान करून ते कर्म नष्ट करू शकतो. म्हणूनच, हीलर्स किंवा उपचारकांनी नियमितपणे ध्यान केले पाहिजे.

हीलिंगच्या प्रक्रियेत हीलिंग केल्या जाणाऱ्या व्यक्तीसाठी एक प्रकारच्या शिक्षणाचा देखील समावेश असतो. या ऊर्जा त्यांच्या स्वत:च्या पद्धतीने खोल पातळीवर त्या व्यक्तीला शिकवण देतात. त्या कदाचित त्याला परिवर्तनाचे महत्त्व सांगतात. एखादी व्यक्ती काही कारणामुळे, कदाचित एखाद्या कर्मामुळे त्रासातून जात असते. हीलिंगच्या ऊर्जा त्या व्यक्तीला बदलण्यासाठी, परिवर्तित होण्यासाठी शिक्षण देण्याचा प्रयत्न करतात. जर त्या व्यक्तीने हे स्वीकारले तर त्या व्यक्तीचे परिवर्तन होण्यास सुरुवात होते, आणि जेव्हा तसे घडते तेव्हा हीलिंग अधिक जलदगतीने होते.

गुरुजींनी हे सुद्धा सांगितले होते की हीलिंग करण्याबाबत आपण खूप सावध असले पाहिजे. आपण उठसूठ लोकांचे हीलिंग करू नये. त्यांनी आम्हाला ह्या बाबतीत खूप विवेकशील राहण्याचा सल्ला दिला होता. त्यांनी आम्हाला आमच्या अंत:प्रेरणेकडून मार्गदर्शन घेण्यास सांगितले होते. अर्थात जेव्हा आपल्याकडे एखादी प्रामाणिक विनंती येते तेव्हा आपण हीलिंगच्या ऊर्जा पाठविण्यास संकोच करण्याची गरज नाही. पण आपण त्याविषयी बोलत राहिले किंवा त्याची जाहिरात केली नाही पाहिजे.

गुरुजींनी खूप स्पष्टपणे सांगितले होते की हीलिंग व्यावसायिक नसले पाहिजे. ते पूर्णत: प्रेमावर आधारित असले पाहिजे. हीलिंगसाठी वापरल्या जाणाऱ्या ऊर्जा आपल्यासाठी उपलब्ध आहेत. परमेश्वर या ऊर्जा उपलब्ध करून देतो. आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की हीलिंग कधीही प्रत्यक्षात आपण करीत नाही. आपण केवळ माध्यम आहोत. पण प्रत्यक्षात उपचार हीलिंगच्या ऊर्जा करतात. आपल्याला जर ह्या सत्याची जाणीव असेल, तर कोणतीही समस्या येणार नाही. आपण नुसतेच एखादे हीलिंग केंद्र उघडून, शुल्क गोळा करून प्रत्येकाचे हीलिंग करू शकत नाही. आपण जर तसे केले तर साहजिकच आपण कर्म गोळा करू. पण या सर्व गोष्टींनी आपल्याला इतके घाबरवूनही सोडू नये की आपण पूर्णतया हीलिंगच्या ऊर्जा पाठविणे थांबवून टाकू. आपण इतक्या टोकाला जाण्याची गरज नाही. गुरुजींचे शब्द – कोणत्याही गोष्टीचा अतिरेक टाळला पाहिजे. संतुलित दृष्टिकोन असणे आध्यात्मिक आहे.

जेव्हा आपण इतरांना हीलिंगच्या ऊर्जा पाठवतो, तेव्हा नेहमीच आपण प्रथम ऋषींना प्रार्थना करतो आणि त्यानंतर संतोषी देवीला, जी येथील हीलिंगच्या ऊर्जांची प्रमुख देवता आहे. ह्या ऊर्जा महान गुरूंनी संग्रहित केल्या आहेत. आणि गुरुजी आम्हाला सांगायचे की हीलिंगच्या ऊर्जा विभिन्न प्रकारच्या असतात. निरनिराळ्या प्रकारच्या समस्यांना किंवा आजारांना निरनिराळ्या प्रकारच्या ऊर्जांची आवश्यकता असते. एखाद्या व्यक्तीला कोणत्या प्रकारची ऊर्जा किती प्रमाणात पाठवली पाहिजे हे संतोषी देवीला माहीत असते. आपले काम सोपे आहे. आपण फक्त प्रार्थना करायची आणि ऊर्जा पाठवायच्या, इतकेच. ■

## प्रश्नोत्तरे

संकलन : शोभा राव, अनुवाद : सुनिता देशपांडे

**प्र: गुरूंना लागू होणारे कर्मांचे नियम हे सामान्य लोकांना लागू पडणाऱ्या नियमांपेक्षा वेगळे असतात का?**

उ: इतर कोणालाही जे नियम लागू असतात, त्या सर्व नियमांचे पालन एका गुरूलाही करावे लागत असते. हे खूप महत्त्वाचे आहे. महर्षी अमरांनी सर्व युगांमध्ये जन्म घेतला होता. त्यांचे स्थान नेहमीच फार महत्त्वाचे होते. त्यांनी आम्हाला सांगितले होते की अवतार जेव्हाकेव्हा मनुष्य जन्म घेतात त्यावेळी ते सर्व मानवी नियमांचे पालन करत असतात. गुरू हा इतर लोकांपेक्षा वेगळा नसतो. मी त्याची व्याख्या एक प्रकारचा वरिष्ठ विद्यार्थी म्हणून करेन. तो जास्त शिकत असतो आणि नवीन ज्ञान लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु त्याला काही विशेष कायद्यांचे पालन करावे लागते. मी त्यांच्यापैकी फक्त काहींचा इथे उल्लेख करण्याचा प्रयत्न करेन.

गुरूला विद्यार्थ्यांच्या कर्मांचा काही अंश घ्यावा लागतो. हा कर्मांचा एक विशेष नियम आहे. त्याला ध्यान करून अशा कर्मांना जाळावे लागते किंवा काही वेळा त्याला त्या कर्मांच्या प्रभावातून जावे लागत असते. त्याला त्याच्या गुरूंकडून मदत मिळत असते. माझ्या बाबतीत ऋषी, देव माझी मदत करतात.

काही वेळा लोकं म्हणतात की ते ध्यान करू शकत नाहीत. काही लोकांच्या खूप प्रामाणिक अडचणी असतात. त्यांना ध्यान करणे शक्य नसते. अशा लोकांना साधनेच्या पुढील स्तरावर टाकण्याचा अधिकार गुरूंना असतो. जेव्हा आपल्याला भौतिक पातळीवर अडचणी असतात तेव्हा आपण साधना किंवा ध्यानधारणेकडे पूर्ण लक्ष देऊ शकत नाही. एक गुरू असे अवरोध दूर करू शकतात.

गुरू, साधकाच्या आध्यात्मिक प्रयत्नांत किंवा त्याच्या साधनेत मदत करताना काही विशिष्ट कायद्यांचे उल्लंघन करू शकतात. म्हणूनच मी असे म्हणालो की गुरूला विशेष कायद्यांचे बंधन असते. विद्यार्थ्यांपेक्षा त्यांच्याकडे जास्त जबाबदाऱ्या असतात. एक विद्यार्थी सुरुवातीला साहजिकच बऱ्याच गोष्टींशी अनाभिज्ञ असतो. तो गुरूकडे केवळ मार्गदर्शनासाठी नाही तर ज्ञानप्राप्तीसाठी सुद्धा येत असतो. गुरू हा एका आरशासारखा असतो. तो तुम्हाला तुमच्यातील क्षमता आणि कमतरता पाहण्यात मदत करत असतो.

गुरूला नियमितपणे प्रत्येक विद्यार्थ्याचा अहवाल सादर करावा लागत असतो. मी ते करत असतो. गुरूला त्याच्या गुरूंना सर्व सांगावे लागत असते. इथे ऋषींप्रती माझी ती जबाबदारी आहे. ऋषी जरी प्रत्येकाची प्रगती आणि त्यांच्या जीवनाचे निरीक्षण करत असतात, तरी गुरूंनाही ते करावे लागते. गुरूंना जास्त कळते कारण ते या पातळीवर राहत असतात. म्हणूनच वारंवार मानवी गुरूंना भेटणे गरजेचे असते. आपल्या व्यवस्थेत पोस्टाद्वारे मार्गदर्शन ठीक आहे. आम्हाला साधकांकडून अहवाल मिळतो, त्याचा अभ्यास करून आम्ही त्यांना सल्ला आणि मार्गदर्शन देतो. या प्रक्रियेत साधकाशी एकप्रकारे वैयक्तिक संपर्क असतो. स्वतः गुरू हे लोकांना त्यांचे अनुयायी म्हणून निवडत असतात. तुम्ही जन्माला येण्याआधीच ऋषींनी तुम्हाला निवडले होते. ही एक फार मोठी संधी आहे. गुरूंच्या अनेक जबाबदाऱ्या असतात आणि त्याचप्रमाणे विद्यार्थ्याच्या देखील.

या सृष्टीतील प्रत्येकचजण दोन प्रकारच्या कायद्यांनी बांधील आहे. पहिल्या प्रकारचे कायदे म्हणजे ज्या पृथ्वीवर आपण राहत असतो त्या पृथ्वीचे कायदे असतात. दुसऱ्या प्रकारचे कायदे हे सार्वभौम कायदे असतात जसे सत्य, शांती. येथे कोणत्याही प्रकारची तडजोड होऊ शकत नाही.

**प्र: तुम्ही म्हणाला होतात की तुम्हाला परब्रह्म समजायला खूप जास्त वेळ लागला होता. तुम्ही त्याबद्दल आम्हाला स्पष्ट करून सांगाल का?**

उ: हे अगदी सोपे आहे. जेव्हा मी लहान होतो तेव्हा घरी आणि मंदिरात मूर्तींची पूजा मी करत असे. भगवान ब्रह्मा म्हणजे सृष्टीचे निर्माते हे मला माहीत होते, पण मला परब्रह्मांबद्दल काहीच कल्पना नव्हती. केवळ महर्षी अमरांना भेटल्यानंतरच मला या बाबत स्पष्टपणे समजले. मला समजले की सर्व रूपं ही त्या निराकार परमात्म्यातून प्रकट झाली आहेत. आपण या परमात्म्याला प्रकाश किंवा चैतन्याचा महासागर असे काहीही म्हणू शकतो. तो परब्रह्म आहे. मला हे व्यवस्थितपणे समजायला खूप जास्त वेळ लागला. बौद्धिक पातळीवर समजून घेणे ही एक गोष्ट आहे आणि त्याला अनुभवणे ही वेगळी गोष्ट आहे. महर्षी अमरांच्या मार्गदर्शनाखाली साधना करणाऱ्या लोकांनी परब्रह्माची अनुभूति घेतली होती. ■


### आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| Light Body & Other Realities | 100/- |
| Master-Pupil Talks | 60/- |
| Master-Pupil Talks - Vol 2 | 75/- |
| iGuruji Vol 1,3,4 & 7 | each 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| iGuruji - Vol 6 | 75/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 2 | 150/- |
| Channelled Knowledge from the Rishis-Vol 3 & 4 | each 200/- |
| Guruji Speaks Part - I & II | each 200/- |
| Guruji Speaks (Vol 3) | 150/- |
| Guruji Speaks (Vol 4) | 250/- |
| Guruji Speaks (Vol 5 & 7) | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 & 2 | each 200/- |
| The Book of Reflections - Vol 3 | 150/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences - Vol 1 & 2 | each 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| Quotes from the Rishis - Vol 1 & 2 | each 100/- |
| Pyramid Revelations | 100/- |
| Thus Spoke Guruji Krishnananda - Vol 1 | 200/- |
| Thus Spoke Guruji Krishnananda - Vol 2 | 250/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| आयगुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| गुरु-शिष्य संवाद (Marathi) | 60/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |
| आत्मा का अवतरण (Hindi) | 50/- |

### ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)

मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१-२८६-१८९०/२४४-९५८५)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)

द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)


द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)

उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

Published: 21st of Every Month. RNI. No. KARMAR/2008/27314 Regd. Postal Regn. No. KARN/BGE/1125/ 2017-2019
Date of posting Newsletter-25th or 27th or 29th of Every Month. Posted at Bangalore PSO, Bg-560026 No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९ – २०१२)

### मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

### मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे "मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

### अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

### स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

### ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

### भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

### अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०–जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

## आध्यात्मिक अनुभव

संकलन : शोभा राव, अनुवाद : गुरुराज कानाडे

माझ्या मुलीचे लग्न आहे आणि त्याच्या तयारीच्या कार्यात दररोज नवनवीन अडथळे निर्माण होतात. पण ऋषींच्या कृपेने दिवसाअखेर त्याचा ताण कमी होतो. ह्याकरिता मी गुरुजी व ऋषींप्रती अगदी कृतज्ञ आहे. मला पूर्ण विश्वास आहे की हे कार्य अगदी सुरळीतपणे पार पडेल.

– नंदिता पटेल

रात्री झोपेत वाईट स्वप्न येण्याच्या त्रासाचे पूर्णपणे निराकरण झाले आहे. आता मी अगदी शांतपणे झोपू शकत आहे. हे केवळ गुरुजींच्या कृपेने व ध्यानसाधनेमुळे शक्य झाले आहे.

मला नमूद करावेसे वाटते की १८ नोव्हेंबर २०१७ रोजी पहाटे मी स्वप्नात गुरुजींना पाहिले. ते काय म्हणाले हे मला आठवत नाही पण गुरुजींनी मला दर्शन दिले ह्याचा मला आनंद आहे.

– निर्मला ए. एन.

दररोज ध्यानानंतर मी प्रार्थना करते की मी आणखी दयाळू व्हावे, शांत व्हावे, माझ्यातून आणखी जास्त दैवी प्रेम प्रकटावे व मला सतत प्रकाशाची जाणीव असावी. आणि आता हळूहळू, ज्या परिस्थितीत पूर्वी मी चिंताक्रांत होत असे, तशाच परिस्थितीत मी अगदी शांत राहू शकते आहे. आता मी जास्त प्रेमळ व सहनशील बनले आहे. ज्या छोट्या छोट्या गोष्टींबद्दल पूर्वी मी खूप चिंता करीत असे त्या गोष्टींना मी आता अगदी सहजतेने सोडून देते! जेव्हा गुरुजी म्हणत, "जास्त प्रेम प्रकट करा" तेव्हा त्यांना नक्की काय म्हणावयाचे आहे हे सत्य जाणण्याचा प्रयत्न मी कधीच केला नव्हता. पण आता काही करण्यापूर्वी मी क्षणभर थांबते आणि स्पष्टतेच्या त्या क्षणांदरम्यान प्रकाशास कार्य करू देते!

– श्रिया शशांक

काही दिवसांपूर्वी मी माझी जुनी ईमेलं पाहत असताना, गुरुजींनी महासमाधी घेण्यापूर्वी, ईमेलवर त्यांच्यासोबत झालेली माझी देवाणघेवाण माझ्या वाचनात आली. त्यांनी लिहिलेला प्रत्येक शब्द प्रेमाने ओतप्रोत होता. त्यांनी लिहिलेली उत्तरे अगदी मोजक्याच शब्दांमध्ये होती पण ती वाचताना माझे डोळे पाणावले. माझ्यासारख्या अगदी नवख्या विद्यार्थ्याच्या – ज्याने २०१२ मध्येच ध्यान वर्गात प्रवेश घेतला होता – ईमेलचे उत्तर देण्यास गुरुजींनी वेळ काढला ही, अद्भुत गोष्ट होती!

– विनम्र लोंगानी

एक व्यक्ती खूपच नकारात्मक होती. मी तिला नियमितपणे बरेच महीने प्रकाश पाठविला. काही काळानंतर तिने ध्यान करण्यास सुरुवात केली व आता ती खूप सकारात्मक आहे. माझ्या जीवनात शांती आणल्याबद्दल परमेश्वराचे व प्रकाशाचे आभार.

– एक साधक

मला शांत, सशक्त व उत्साही वाटते आहे. मी शांतपणे अडचणींना सामोरे जाऊ शकत आहे आणि अनिश्चिततेचा स्वीकार करून, त्याप्रमाणे तडजोड करू शकत आहे.

– अशोक ठाकुर

गेल्या काही महिन्यांपासून मी ऋषींची कृपा व त्यांची मदत अनुभवतो आहे. जसे ध्यान करण्यासाठी मी जास्त प्रयत्न करत आहे, तसे ऋषी मला कधी नव्या ऊर्जा देऊन तर कधी त्यांच्या प्रत्यक्ष उपस्थितीने माझी मदत करत आहेत. माझ्या अंतरंगात शांतता प्रस्थापित होत आहे व माझ्या ध्यानाचा दर्जा देखील उंचावला आहे.

– रमेश के.

माझ्या ध्यानसाधनेचा अवधी मी वाढवल्यापासून माझ्यात विस्तीर्ण शांतता आहे. अगदी तणावपूर्ण परिस्थितीत देखील, प्रतिसाद देण्यापूर्वी मी काही क्षण थांबू शकते आहे. कधीकधी मला खूप आनंद वाटतो – आपल्याला माहीत असलेल्या साधारण खुषीच्या पलीकडील ही अनुभूती असते.

– निर्मला जे.

डिसेंबरमध्ये एके दिवशी भल्या पहाटे गहन ध्यानानंतर माझ्या आश्चर्यास पारावार उरला नाही, कारण मी माझ्या शरीरातून बाहेर पडलो होतो. सुरुवातीला मी आमच्या इमारतीच्या वर तरंगत होतो, पण त्र्यंबकेश्वर येथील एका विशिष्ट गुहेला भेट देण्याच्या विचाराने क्षणार्धात मला तेथे पोहोचविले. अगदी क्षणार्धातच मी मुंबईत माझ्या बिछान्यावर परत आलो. महान आध्यात्मिक गुरुंमुळेच हा आध्यात्मिक अनुभव घेणे मला शक्य झाले. त्यानंतर मला खूप शांती जाणवली. त्यानंतर माझे मन बराच वेळ अगदी स्थिर होते.

– राजेंद्र रांगणेकर

औषधांमुळे आराम न पडल्याने मी गुरुजी व ऋषींची प्रार्थना करण्यास सुरुवात केली. त्यांच्या दैवी कृपेने व आशीर्वादामुळे माझी प्रकृती बरीच सुधारली आहे. आता मी पूर्वीपेक्षा बरंच व्यवस्थितपणे ध्यान करू शकतो, जास्त नियमितपणे करू शकतो व जास्त वेळ प्रकाश अनुभवू शकतो, जेव्हा मला शांती व स्तब्धता जाणवते. मला ह्या सुंदर मार्गावर आणल्याबद्दल मी गुरुजी, ऋषी व परमेश्वराप्रती मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

– सदानंद पी. व्ही.

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 300/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban - 560077 and
Printed at M/s. ART PRINT, 719/A, West of Chord Road, 2nd Stage, Rajajinagar, Bangalore - 560086. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande